# ***महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई***

जा.क्र.मप्रनि/तांशा/ब- १८४१,
श्री.छत्रपती शिवाजी महाराज मंडई इमारत,
४ था मजला, माता रमाबाई आंबेडकर मार्ग,
मुंबई -४०० ००१.

दिनांक - २६/०२/२००१.

***परिपत्रक***

***विषय :-*** तबेले, गोठे इत्यादीमुळे निर्माण होणा-या प्रदुषणास आळा घालण्याविषयी मार्गदर्शक तत्वे,

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे जनावरांचे तबेले व गोठे निर्माण होणा-या प्रदुषण प्रश्नाबाबत वारंवार तक्रारी येत असतात. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे जनावरांचे तबेले किंवा गोठे यांना परवानगी दिली जात नाही. तबेले व गोठे यांना स्थानिक पातळीवर महसुल विभाग, जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत परवाने दिले जातात. असे परवाने देताना तबेले व गोठे यामुळे होणा-या प्रदुषणासंबंधी करावयाच्या उपाययोजनेसंबंधी योग्य त्या अटी घातल्या जात नाहीत, असे निदर्शनास आल्याने, यासंबधी विचार करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, महसुल विभाग, नगररचना विभाग, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद इत्यादीच्या अधिका-यांची एक समिती ठाणे जिल्हयासाठी गठीत करण्यात आली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार तबेले व गोठे इत्यादीमुळे होणा-या प्रदुषणास आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे ठरविण्यात आलेली आहेत. तबेले व गोळे यांना परवानगी देताना सदर मार्गदर्शक तत्वे विचारात घेउन संबंधीत विभागाने योग्य ती छाननी करावी व प्रदुषण नियंत्रणाच्या उपाययोजनेसंबंधी अटी घालण्यात याव्यात.

## ***प्रदुषण नियंत्रणासंबंधी करावयाच्या उपाययोजना***

१. जनावरे बांधावयाच्या ठिकाणची तळजमीन, सिमेंट क्रॉक्रीटने किंवा फरशी बसवुन तयार करावी तसेच या जमीनीस योग्य उतार देउन जनावरांचे मलमुत्र तसेच जनावरे धुण्याचे पाणी पक्कया गटरामध्ये जाईल, अशी व्यवस्था करावी.

२. जनावरे बांधावयाच्या जागेच्या मध्यभागी पाणी वाहुन नेण्यासाठी पक्के सिमेंटचे गटार बांधुन तसेच गोठयाच्या सभोवती सांडपाणी वाहुन नेण्यासाठी पक्के सिमेंट नाले बांधण्याची व्यवस्था करावी.

३. ज्या गोठयातील जनावरांची संख्या १० पेक्षा अधिक आहे, अशा ठिकाणी जनावराच्या मलमुत्रावर प्रक्रीया करण्यासाठी गोबर गॅस प्लान्ट बसविण्यात यावेत, त्यातुन निर्माण होणारा वायु इंधन म्हणुन किंवा दिवा म्हणुन वापरण्यात यावा.

४. ज्या गोठयातील जनावरांची संख्या १० पेक्षा कमी असेल. त्यांनी गोठयातील सांडपाण्यावर प्रक्रीया करण्यासाठी सेफ्टीक  टॅक पध्दतीची यंत्रणा उभारावी व सेंफ्टीक टॅकमधुन निघणारा ओव्हर फ्लो सोकपीटमध्ये सोडण्यात यावा.  गोठयातुन निघणा-या शेणासाठी कंपोस्ट खडडा तयार करण्यात यावा व त्यामध्ये माशा किंवा डास यांची उत्पत्ती न होण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी,

५. गांबर गॅस प्लान्ट मधुन निर्माण होणारा गाळ सुकविण्यासाठी स्लज डाईंग बेड बांधण्यात  यावेत.

६. गोठयांना लागणा-या चारा, खादय इत्यादी सामुग्रीचे व्यवस्थापन योग्यरित्या करावे.  सदर चारा व खादयसामुग्री परिसरात पसरणार नाही, याची खात्री करावी.  जनावरांनी  न खाल्लेला चारा कंपोस्ट खडडयामध्ये  टाकण्यात यावा.

७. गोठयाच्या  अवतीभवती व परिसरात स्थानिक जातीची झाडे लावण्यात यावीत.

८. तबेले धारकांच्या एकुण जागेपैकी ४०%  जागा ही मोकळी असावी व त्या ठिकाणी प्रत्येकी ३ मी. अंतरावर  स्थानिक जातीची झाडे लावण्यात यावीत.

९. गोठयाच्या परिसरात जंतुनाशकाची   फवारणी  नियमितपणे करुन घेण्यात यावी.

***तबेले  किंवा गोठै यांच्या स्थाननिश्चयनाबाबत मार्गदर्शक तत्वे***

१. तबेले किंवा गोठे लोकवस्तीपासुन किमान १ कि.मी. अंतरावर असावेत व गोठे व तबेल्यालगतचा परिसर शक्यतो गायरान किंवा हरितपटटा असावा.
२. गोठे किंवा तबेले नदी व तलावापासुन कमीतकमी १ कि.मी. अंतरावर असावेत. अस्तित्वात असलेल्या विहिरींपासुन गोठयांचे अंतर किमान १५ मीटर असावे.
३. राष्ट्रीय महामार्ग/राज्य महामार्ग यांच्या पासुन  तबेले व गोठे यांचे अंतर किमान १०० मीटर असावे.
४. स्थानिक स्वराज्य संस्थेने गोठे व तबेले उभारण्यासाठी प्रदुषण नियंत्रणबाबत योग्य त्या सुविधा देउन विशिष्ट विभाग विकसित करावा.  सध्या अस्तित्वात असलेल्या शहरातील / गावातील  तबेले किंवा गोठे अशा सुनियो जित ठिकाणी टप्प्या-टप्प्याने हलविण्यात यावेत.

***(कि.ह.मेहता)***
***सदस्य सचिव***

***प्रत माहितीसाठी व योग्य त्या माहितीसाठी अग्रेषित-***

१. जिल्हाधिकारी
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
३. उप सचिव, नगर विकास विभाग (नगररचना) मंत्रालय, मुंबई -३२
४. उप सचिव, पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

***प्रत माहितीसाठी -***

१, प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय/मुंबई/नवीमुंबई/ठाणे्/कल्याण/रायगड/पुणे/औरंगाबाद/नागपुर/नाशिक कोल्हापुर/अमरावती/

**२.** उप प्रादेशिक अधिकारी-मुंबई-१/मुंबई-२/मुंबई-३/जल/हवा/धुम्र मुख्यालय/ठाणे/तारापुर/नवी मुंबई-१/नवी मुबई -२/कल्याण-१/कल्याण-२/रायगड-१/रायगड -२ /सांगली/अमरावती/अहमदनगर रत्नागिरी/पुणे/पिंपरीचिंचवड/सातारा/औरंगाबाद/नांदेड/नाशिक/जळगाव/नागपुर/चंद्रपुर/अकोला